# गरिबांना अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा पुरवाव्यात

**केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा युवा डॉक्टरांशी संवाद : राज्यपालांच्या उपस्थितीत एम्सचा पहिला पदवीदान समारंभ**










■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :** एम्ससारख्या एका प्रतिष्ठित संस्थेतून पदवी पूर्ण केल्यानंतर डॉक्टर म्हणून तुमच्यावर मोठी जबाबदारी आहे. गरिबांची निःस्वार्थ रुग्णसेवा करा. उपेक्षित भागापर्यंत जास्तीत जास्त अत्याधुनिक वैद्यकीय सोयीसुविधा पोहोचविण्यावर भर द्या, असे आवाहन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन व नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत शनिवारी नागपूरच्या अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेचा (एम्स) पहिला पदवीदान दीक्षांत समारोह पार पडला. यावेळी खा. श्यामकुमार बर्वे, खा. राजेंद्र गोपछडे, आ. संजय मेश्राम, एम्सचे अध्यक्ष डॉ. अनंत पंढरे, कार्यकारी संचालक डॉ. प्रशांत जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

गडकरी म्हणाले, विदर्भाच्या ग्रामीण भागांमधील रुग्णांना उत्तम आरोग्य सेवा देण्याचे आणि वैद्यकीय सुविधा पुरविण्याचे काम एम्सच्या माध्यमातून होत आहे. भविष्यात एम्सच्या कामाची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेतली जावी, यादृष्टीने प्रयत्न होतील, असा आशा आहे.ज्या सुविधा इतर रुग्णालयांमध्ये नाहीत, त्या एम्समध्ये मिळणे अपेक्षित आहे. विशेषतः उत्तर नागपूरसह पूर्व विदर्भात थॅलेसिमिया, सिकलसेलची मोठी समस्या आहे. या उत्तर नागपुरात तर हजारो रुग्ण आहेत. आता एम्समध्ये बोन मॅरो ट्रान्सप्लान्ट होत आहे, ही आनंदाची बाब आहे. त्यामुळे प्रादेशिक समस्या लक्षात घेऊन काम करणे अपेक्षित आहे, असेही गडकरी म्हणाले.

### गडकरी हे भारताचे केनेडी!

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी पदवीदान समारंभानंतर डॉक्टरांचे आणि व्यवस्थापनाचे कौतुक केले. त्याचवेळी त्यांनी ना. श्री. गडकरी यांच्याविषयी गौरवोद्गार काढले. ते म्हणाले, देशाच्या विकासात चांगले रस्ते महत्त्वाची भूमिका बजावतात, असे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉन एफ केनेडी म्हणायचे. गडकरींनी देशभरात केलेले काम बघून मी त्यांना भारताचे जॉन एफ केनेडी मानतो. त्यांच्या या वाक्याला टाळ्यांचा कडकडाट झाला.

**चांगला डॉक्टर चांगला माणूस असावा**

वैद्यकीय शिक्षण घेतल्यानंतर डॉक्टर म्हणून समाजात प्रतिष्ठा प्राप्त होते. पण चांगला माणूस चांगला डॉक्टर असणे आवश्यक आहे. चांगले काम केले की प्रगती आपोआप होते, असा सल्लाही नितीन गडकरी यांनी यावेळी दिला.

# काँग्रेसच्या प्रवक्त्याविरुद्ध गुन्हा दाखल

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :** छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांबाबत आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या प्रशांत कोरटकर याला तेलंगणात पळून जाण्यास मदत करणाऱ्या प्रशिक पडवेकर याच्याबाबत मुख्यमंत्र्यांना प्रश्न विचारला म्हणून काँग्रेसचे प्रवक्ते अतुल लोंढे यांच्याविरुद्ध गणेशपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केल्याची माहिती आहे.

भाजपचे आमदार प्रवीण दटके, आ. कृष्णा खोपडे आणि भाजपचे शहराध्यक्ष बंटी कुकडे यांच्या नेतृत्वात तक्रार देण्यात आली होती. शिवद्रोही प्रशांत कोरटकर याची चंद्रपुरातील आलिशान हॉटेलात मुक्कामाची व्यवस्था करण्यापासून तर तेलंगणा राज्यात पळूण जाण्यात मदत करण्यापर्यंत भाजपच्या एका बड्या नेत्याच्या नागपूर कार्यालयात काम करणारा भाजप कार्यकर्ता प्रशिक पडवेकर आघाडीवर होता. कोरटकर याला तेलंगणात पळवून नेण्यात भाजप सहभागी आहे असा आरोप काँग्रेसते प्रवक्ते अतूल लोंढे यांनी केला होता मुख्यमंत्री खरेच शिवप्रेमी असाल तर खरी माहती लोकांना द्यावी, असेही ते म्हणाले होते.

त्यामुळे भारतीय जनता पक्षामध्ये खळबळ उडाली. भाजपचे आमदार प्रवीण दटके, कृष्णा खोपडे, शहरअध्यक्ष बंटी कुकडे यांच्यासह शेकडो भाजपचे कार्यकर्ते गणेशपेठ पोलीस ठाण्यात हजर होते. त्यांनी अतुल लोंढे मुदार्बादचे नारे लावले. मुख्यमंत्र्यांची विनाकारण बदनामी करणे, दोन समाजात तेढ निर्माण करणे या कलमाखाली गुन्हे दाखल करण्याची मागणी भाजपचे बंटी कुकडे यांनी केली होती.






# शिवाजी महाराजांना एका समाजापुरतेच मर्यादित करू नका

**अजित पवार यांची विनंती**



■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २९ :** छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरा पगड जाती आणि बारा बलुतेदारांना बरोबर घेऊन हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. महाराजांनी कधीही जात, धर्मात भेदभाव केलेला नाही. त्यांचा एकंदरीत इतिहास पाहिला तर वेगवेगळ्या समाजातील, समाजाचे, धमार्चे, पंथाच्या लोकांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करण्यासाठी महाराजांना मनापासून साथ दिलेली आहे. मात्र, काहीजण वेगळ्या पद्धतीने इतिहास लोकांच्या समोर आणण्याचा प्रयत्न करतात. कृपा करून महाराजांना एका समाजापुरतेच मर्यादित करू नका, महाराज सर्वांचे होते, असा सल्ला अजित पवार यांनी दिला आहे.

स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वढू बु. येथील महाराजांच्या समाधी स्थळाचे दर्शन घेतले. या नंतर त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. त्या वेळी ते बोलत होते.

अजित पवार म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे कोणत्या एका समाजाचे नव्हते तर ते हिंदवी स्वराज्याचे होते. छत्रपती संभाजी महाराज यांना देखील पुढील काळामध्ये केवळ ९ वर्षे मिळाली. मात्र त्यांनी देखील अशाच पद्धतीने काम केले. शौर्य कसे असावे याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे संभाजी महाराज होते. आपल्यातील लोकांनी फितुरी केली आणि त्यातून जो इतिहास घडला तो सर्वांपुढे असल्याचे अजित पवार म्हणाले.

फुले-शाहू-आंबेडकरांची यांची विचारधारा जशी आहे, ज्यात सर्व जाती धमार्तील लोकांना बरोबर घेऊन आपल्याला पुढे जायचे आहे. त्याकरता सर्वांनी सहकार्य करावे, सर्वांनी साथ द्यावी, त्यातूनच राज्याचे भले होणार असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे.

# आदित्य ठाकरेंच्या बदनामीचे षडयंत्र

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २९ :** दिशा सालियन प्रकरणात आदित्य ठाकरे यांच्यावर न्वयाने आरोप करण्यात आल्याने राजकारण तापले असून, माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी मोठा दावा केला आहे.



दिशा सालियन प्रकरणात मालवणी पोलिसांनी कालच क्लोजर रिपोर्ट दिला आहे. या प्रकरणात आदित्य ठाकरे यांना बदनाम करण्याचं राजकीय षडयंत्र सुरू आहे, मी गृहमंत्री असल्यापासून सांगत आहे, की हे एक षडयंत्र आहे, आणि हेच सत्य आहे, असं अनिल देशमुख म्हणाले.

दिशा सालियन प्रकरणात तिचे वडील सतीश सालियन यांनी मुंबई हाय कोर्टात याचिका दाखल केली आहे. या प्रकरणात आदित्य ठाकरे यांच्यावर आरोप करण्यात येत आहेत. पोलिसांनी क्लोजर रिपोर्ट दिल्यानंतरही आदित्य ठाकरे यांना गोवण्याचा प्रकार सुरू असल्याचे देशमुख म्हणाले.



■ **अमरावती -** जिल्ह्यातील सावरखेड येथे खोरगडे वाडा मध्ये गुढी पाडव्याच्या पुर्वसंध्येला मॉडेल पूनम जामोदकर, सोनाली भास्कर यांचे छायाचित्रकार प्रतिक रोहणकर यांनी आकर्षक छायाचित्र टिपले.

# शिंदे गट कामराचा खून करणार का?

**संजय राऊत यांचा सवाल**



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :** महाराष्ट्रात एकप्रकारे गुजराज किंवा उत्तर प्रदेश पॅटर्न राबवला जात आहे. महाराष्ट्र थोडासा वेगळा आहे असे आम्हाला वाटले होते पण देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे त्याच मार्गाने चालले आहेत. अजित पवार यांचा मार्ग मला वेगळा दिसत आहे, असे ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी म्हटले आहे.

संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, अजित पवारांना हे सर्व माहिती असल्याने त्यांची भूमिका आणि भाषा वेगळी आहे. पण ते कैचीमध्ये अडकलेले दिसून येत आहे. कुणाल कामरा आणि माझे कालच बोलणं झाले. मी त्याला सांगितले की आपण कायद्याला सामोरे गेले पाहिजे. कुणाल कामरा हा अतिरेकी, देशद्राही कोण आहे तो? तो काय अल कायदाचा मेंबर आहे का? असा सवाल राऊतांनी उपस्थित केला आहे.

संजय राऊत म्हणाले की, कुणाल कामरा हे देशातील एक कलाकार, कवी, लेखक आहेत. शिंदेंचे कुणाबरोबर फोटो आहे ते आम्ही बाहेर काढू का? कुणाल हा फुटीरतावादी आहे का? हा देश संविधानावर चालतो. कुणी जर कायदेशीर कारवाई केली असेल तर त्याला सामोरे गेले पाहिजे.

संजय राऊत म्हणाले की, एकनाथ शिंदे यांच्या गटातील लोकांना कुणाल कामरा जर शस्त्रू वाटत असेल तर आम्ही त्याच्याशी बोलायचे नाही का? आम्हालाही वाटते पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा हे महाराष्ट्राचे शत्रू आहेत, पण एकनाथ शिंदे आणि त्यांचे लोकं त्यांच्या पायाशी जाऊन बसतात, अशा शब्दात संजय राऊत यांनी तोफ डागली.














